डीपी आरक्षणावरुन आमदार अमित गोरखे परिषदेत आक्रमक

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 13/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 154 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# शिवकालीन 12 किल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक वारसा मानांकन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराज्याचा ऐतिहासिक ठसा आता आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला आहे. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ अशा एकूण १२ किल्ल्यांना 'युनेस्को'चे जागतिक वारसा स्थळ (World Heritage Site) म्हणून मानांकन मिळाले आहे. हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण ठरला आहे.



या मानांकनासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्यातर्फे प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी (महाराष्ट्र) आणि जिंजी (तामिळनाडू) यांचा समावेश होता.

'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळ मानांकनासाठी आवश्यक असलेल्या "अद्वितीय वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value)" या निकषांवर हे किल्ले खरे उतरले. शिवकालीन दुर्गांचे सामरिक, स्थापत्य व सांस्कृतिक महत्त्व, सह्याद्रीच्या कुशल वापरातून साकारलेली माची स्थापत्यशैली आणि गनिमी काव्याचे युद्धतंत्र या सर्व बाबी मानांकनाच्या निर्णयामध्ये निर्णायक ठरल्या.

**शासनाचा पुढाकार आणि व्यापक सहकार्य**

या ऐतिहासिक घडामोडीसाठी अनेक शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे कार्य केले. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि संस्कृती मंत्रालय, भारत सरकारमार्फत २०२४-२५ या वर्षाकरिता निवडलेल्या ५ प्रस्तावांपैकी महाराष्ट्राचा मराठा लष्करी स्थापत्य हा प्रस्ताव प्रधानमंत्री कार्यालयाने युनेस्कोकडे पाठविण्यासाठी निवडला होता.

या यशस्वी प्रवासात वास्तुविशारद डॉ.शिखा जैन आणि पुरातत्व संचालक डॉ.तेजस गर्गे यांचे योगदान मोलाचे ठरले. 'युनेस्को'च्या ४६व्या अधिवेशनात राज्यातील अधिकारी, गड संवर्धन समिती सदस्य व तज्ज्ञांचा सहभाग होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये ICOMOS तज्ज्ञ श्री. ह्वाजोंग ली यांनी या १२ किल्ल्यांची स्थळ भेट घेतली आणि जिल्हाधिकारी व वनविभागांनीही सहकार्य केले.

**राजकीय नेतृत्वाचे प्रभावी योगदान**

या मानांकनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेऊन शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा आणि, पुरातत्व संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांच्या प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले.

**शौर्य, वारसा आणि पर्यटनाला चालना**

हे मानांकन केवळ ऐतिहासिक किल्ल्यांचे गौरवगान नाही, तर पर्यटन, संशोधन व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा निर्णायक टप्पा आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचे शौर्य, स्थापत्य परंपरा आणि स्वराज्यरचना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अधोरेखित झाली आहे.

"छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्गसंपदा म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा आहे. 'युनेस्को'चा दर्जा हा त्या ऐतिहासिक समृद्धतेला जागतिक मान्यता देणारा आहे." असे मत सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी व्यक्त केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 13/07/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मिसिंग लिंक प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार - मुख्यमंत्री

|दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. या प्रकल्पातील एक बोगदा देशातील सर्वात लांब बोगदा असून या प्रकल्पामुळे पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ अर्ध्या तासाने कमी होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुंबई -पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या कामाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार बाळा भेगडे, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सह व्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल, राजेश पाटील मुख्य अभियंता राजेश निघोट, अधीक्षक अभियंता राहुल वसईकर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई- पुणे या महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे हे अंतर कमी होणार असल्याने प्रवाशांना याचा फायदा होणार आहे. महामार्गावरील घाट असलेला भाग या प्रकल्पामुळे टाळता येणार असून घाटमार्गामुळे होणारा वाहतुक अडथळा दूर होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या महामार्गावर आरामदायी प्रवास होणार आहे. मिसिंग लिंक प्रकल्पांतर्गत एकूण तीन बोगदे असून एक बोगदा ९ किलोमीटर लांब व २३ मीटर रुंदचा असून देशातल्या सर्वात जास्त लांबीचा बोगदा ठरणार आहे. या अगोदर समृद्धी महामार्गावरील बोगद्याचा विक्रम या बोगद्यामुळे मागे पडेल. प्रकल्पांतर्गत अतिशय उंच पूल बांधण्यात येत असून याची उंची १८५ मीटर आहे. देशामध्ये आत्तापर्यंत एवढा उंच पूल कुठल्याच ठिकाणी बांधला गेला नाही. हा देखील एक विक्रम होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने या प्रकल्पाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. या प्रकल्पाचे एकूण ९४ टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असेही फडणवीस म्हणाले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत प्रकल्पाचे काम करणारे अभियंते आणि कामगारांचे कौतुक केले.

# पिंपरी-चिंचवड डीपीवर चाळीस हजारांहून अधिक हरकती जमा

|दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चुकीच्या पद्धतीने नवीन सुधारित प्रारूप विकास आराखडा (डीपी प्लॅन) तयार केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह भूमिपुत्रांमध्ये असंतोष वाढला आहे.




त्यामुळे डीपीमधील विविध आरक्षणांबाबत हरकतींचा पाऊस पडत आहे. महापालिकेच्या नगररचना विभागाकडे शुक्रवारपर्यंत (दि. ११) चाळीस हजाराहून अधिक हरकती प्राप्त झाल्या आहेत. हरकत व सूचना नोंदविण्यासाठी सोमवार (दि. १४) हा अखेरचा दिवस आहे.पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा एकत्रित डीपी आराखडा महापालिकेने तयार केला आहे. शहरातील २८ गावांच्या एकूण १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या आराखड्यात शहरातील विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे तसेच सार्वजनिक सेवा व सुविधांसह नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत.

डीपीबाबत नागरिकांकडून १४ जुलैपर्यंत हरकती व सूचना मागवल्या आहेत.

मात्र, डीपीमध्ये अनावश्यक आरक्षणे समाविष्ट केली गेली आहेत. दाट लोकवस्तीतून रस्ते व रिंगरोड प्रस्तावित करण्यात आले आहेत.

तसेच गरज नसतानाही मोठ्या संख्येने व्यापारी संकुले व इतर सुविधांसाठी आरक्षणे प्रस्तावित केली गेली आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या नवनिर्वाचित राज्य परिषद सदस्यांचा सत्कार

## शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटेंनी केले अभिनंदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड : भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी २०२५ ते २०२७ या कालावधीसाठी जाहीर केलेल्या राज्य परिषद सदस्यांच्या यादीत पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक अनुभवी नेत्यांचा समावेश झाल्याने शहरात उत्साहाचे वातावरण आहे.

या नवनिर्वाचित सदस्यांचा पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राज्य परिषद सदस्यपदी निवड झालेल्यांमध्ये विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, पक्षाचे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते पाटीलबुवा चिंचवडे, कामगार नेते हनुमंत लांडगे, आणि मातंग समाजातील युवा भाजप कार्यकर्ते धर्मेंद्र क्षीरसागर यांचा समावेश आहे. या निवडीमुळे समाजातील विविध घटकांना पक्षाशी जोडण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

या महत्त्वपूर्ण यादीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख नेते, मंत्री, खासदार आणि आमदार यांचाही समावेश आहे.

पक्षाची ध्येयधोरणे पुढे नेण्यासाठी आणि संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी या सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर भाजप कार्यालयात आयोजित या सत्कार सोहळ्यात शहराध्यक्ष बापू काटे यांनी या नवनिर्वाचित सदस्यांपैकी उपस्थित राज्य परिषद सदस्य उषा उर्फ माई ढोरे, अनुप मोरे, पाटीलबुवा चिंचवडे व हनुमंत लांडगे यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हा सत्कार समारंभ पक्षासाठी केलेल्या योगदानाला आणि त्यांच्या भविष्यातील कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, भाजप प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, महेश कुलकर्णी, शहर सरचिटणीस शैला मोळक, महिला मोर्चा शहराध्यक्ष सुजाता पालांडे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मनोज ब्राह्मणकर, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव अजित कुलथे, भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष कैलास सानप, कायदा आघाडीचे शहराध्यक्ष ॲड. गोरक्षनाथ झोळ यांच्यासह शिवराज लांडगे, राजाभाऊ मासुळकर, दिनेश यादव, हरिभाऊ चिंचवडे, प्रवीण कुंजीर, बाळासाहेब परघळे, दीपक गांगुर्डे, आदित्य काटे आदी प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीपी आरक्षणावरुन आमदार अमित गोरखे परिषदेत आक्रमक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिंचवड मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या मागील जागेचे महानगरपालिका उद्देशांसाठी, ज्यात पोलीस स्टेशन आणि बस डेपोचा समावेश आहे, आरक्षण करण्याच्या विरोधात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर मोठा निषेध व्यक्त करण्यात आला.

बहुजन समाजातील सदस्य मोठ्या संख्येने महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ जमले होते आणि त्यांनी या जागेच्या आरक्षणाला तीव्र विरोध दर्शविला. त्यांनी या आरक्षणास विकास योजनेसाठी हानिकारक मानून ते तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, ज्यामुळे आंदोलनाची व्याप्ती दिसून आली.

विधानसभेच्या सत्रादरम्यान, आमदार सल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. त्यांनी अध्यक्ष मा. सभापती, प्रा. राम शिंदे यांना यावर त्वरित बैठक घेऊन जनतेच्या चिंतेचे प्रतिबिंब उमटवणारा निर्णय घेण्याची विनंती केली.

आंदोलकांनी पिंपरी-चिंचवड शहरासाठीचा डीपी (विकास आराखडा) रद्द करण्याची मागणी केली. मोठ्या प्रमाणावर झालेला सहभाग हे दर्शविते की, महानगरपालिकेने सध्याच्या जमीन आरक्षण योजनेवर पुनर्विचार करावा अशी समाजाची तीव्र इच्छा आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 13/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहराचे नाव जिजाऊ नगर करा - आमदार उमा खापरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करून राजमाता जिजाऊ यांचा गौरव करण्यात यावा अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी विधान परिषदेत पावसाळी अधिवेशनात केली.

मुंबई, विधान भवनात सुरू असलेल्या अधिवेशनात शुक्रवारी (दि.११ जुलै) आमदार उमा खापरे यांनी लक्षवेधी द्वारे सभापतींकडे मागणी करताना सांगितले की, पिंपरी, चिंचवड, भोसरी या गावांच्या एकत्रीकरणाने पिंपरी चिंचवड शहराची स्थापना करण्यात आली. पिंपरी चिंचवड शहराला इंग्रजीमध्ये "पीसीएमसी"असे संबोधण्यात येते हे संयुक्तिक नाही. जर पिंपरी चिंचवड शहराला "जिजाऊ नगर" नाव दिले तर शहराचा पूर्वीचा ऐतिहासिक वारसा जपणूक केल्यासारखे होईल. तसेच राजमाता जिजाऊ यांचा तो सन्मान देखील ठरेल. राजमाता जिजाऊ यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराजांचा पदस्पर्श या शहराला झालेला आहे. राजमाता जिजाऊ यांनी दापोडी मधील महादेव मंदिरात दर्शन घेतल्याचे इतिहासात नोंद आहे.



तसेच चिंचवड गावातील महासाधू मोरया गोसावी महाराजांच्या समाधीस्थळी जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भेट झाल्याचे इतिहासात नमूद आहे. आत्ताचे भोसरी गाव म्हणजे राजा भोज यांची भोजापूर नगरी असल्याचा उल्लेख देखील शीलालेखात नोंद आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांची नावे बदलण्यात आली आहेत.

पिंपरी चिंचवड शहराला जिजाऊ नगर असे नाव द्यावे अशी मागणी यापूर्वी भक्ती शक्ती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिरामण बारणे तसेच शहरातील अनेक संस्था, संघटना, मंडळ, ट्रस्ट आणि नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आमदार उमा खापरे यांनी वरिष्ठ सभागृहात ही मागणी केल्यामुळे हा विषय आता लवकर मार्गी लागेल अशी आशा पिंपरी चिंचवड शहरवासीयांमध्ये निर्माण झाली आहे.

# ज्येष्ठ समाजसेवक, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचा सपत्नीक सत्कार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - 'विचारांची भिन्नत असतानाही वेगवेगळ्या लोकांसोबत गिरीश प्रभुणे यांनी काम केले. त्यांची समाजाशी भक्ती आहे. त्यांनी समाजाला ईश्वर मानले. त्यांना समाजसेवेत ईश्वर दिसला. फळ मिळणारच आहे अशा विश्वासाने कर्म मार्गावर त्यांनी वाटचाल केली. त्यांचे कार्य एक तप, साधना, व्रत आहे. अंतःकरणातील ईश्वराच्या बळावर त्यांनी आदर्श काम केल्याचे' गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी काढले.क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शनिवारी आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. जोशी यांच्या हस्ते प्रभुणे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी रवींद्र भोळे लिखित गिरीश प्रभुणे 'जसे कळले तसे' या ग्रंथाचे प्रकाशन



झाले. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या कार्यक्रमाला अरुंधती प्रभुणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, पद्मश्री रमेश पतंगे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, डॉ.सुनिल भंडगे, क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे कार्यवाह ॲड सतिश गोरडे, कोषाध्यक्ष रवी नामदे यावेळी उपस्थित होते. भैय्याजी जोशी म्हणाले, 'चाकोरीवर, मळलेल्या वाटेवर चालणे सोपे असते. अंधारात उडी घेऊन साहशी काम करण्याचे कार्य गिरीश प्रभुणे यांनी केले. प्रकाश आहे हा विश्वास ठेवून त्यांनी काम केले. विचारांची भिन्नत असतानाही वेगवेगळ्या लोकांसोबत काम केले. त्यांची समाजाशी भक्ती आहे. त्यांनी समाजाला ईश्वर मानले. त्यांना समाजसेवेत ईश्वर दिसला. फळ मिळणारच आहे अशा विश्वासाने कर्म मार्गावर त्यांनी वाटचाल केली. समाजाचे प्रश्न बघण्यासाठी अंतकरणातून लागणारी दृष्टी त्यांच्याकडे आहे. प्रश्नांचे अध्ययन, सखोल मांडणी करून समाज सुधारण्यासाठी मन गुंतावे लागते. काय केले पाहिजे हे प्रभुणे यांना समजले. त्यातून यमगरवाडीचा प्रकल्प उभारला. समाजातील वाटचाल करण्यासाठी संकल्प असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. कामे करताना अनेकदा ठेच लागली. प्रत्येक ठेच त्यांना पुढे जाण्याची दिशा देत गेली. त्यांचे कार्य एक तप, साधना, व्रत आहे. अंतःकरणातील ईश्वराच्या बळावर त्यांनी आदर्श काम केले. प्रामाणिक आणि निष्ठेने काम केल्याने त्यांना साधना आणि सहयोग मिळाला. भटके, विमुक्त यांच्या जीवनात बदल, समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या कामात आणण्याचे काम त्यांनी केले. पुढील वाटचाल अशाच प्रकारची रहावी'.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, 'गेली अनेक वर्षे गिरीश प्रभुणे हे वंचित घटकांतील मुलांची सेवा करीत आहेत. पारधी समाजातील मुलांना शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणले जात आहे. त्यांच्या कामांची तुलना कोणाशीच होऊ शकत नाही. प्रभुणे यांच्या मागणीनुसार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून क्रांतीवीर चापेकर यांच्या नावाने टपाल तिकीट काढले. चापेकर वाडा दुरुस्तीसाठी स्थायी समिती अध्यक्ष असताना १८ कोटी रुपयांचा निधी दिला. प्रभुणे यांच्या प्रयत्नामुळे चापेकरवाडा विकसित करण्यात आला आहे. प्रभुणे यांचे काम पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे'. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये वंचित घटकांतील मुलांना कौशल्यपूर्ण शिक्षण दिले जात आहे. पारधी समाजाचे मुले शिक्षणामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. गिरीश प्रभुणे यांच्या कामाचा प्रवाह नदीप्रमाणे आहे'.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968